सकाळ

# नव्या सात शाखा सुरू करण्याचा मानस

## एम. एल. चौगुले; 'खळनाथ को-ऑप.'ची वार्षिक सभा

बेळगाव, ता. २५ : सध्या महाराष्ट्र, कर्नाटक व दिल्ली असे संस्थेचे कार्यक्षेत्र असून गोवा कार्यक्षेत्र वाढीसाठी प्रयत्न सुरू आहेत. गडहिंग्लज प्रधान कार्यालयातील सुविधा केंद्रासह सध्या १२ शाखा असून कराड शाखाही लवकरच सुरु होत आहे. महाराष्ट्रातील पंढरपूर, सांगोला, तासगाव, बांदा, नवी मुंबई तर कर्नाटकातील धारवाड व चिक्कोडी येथे एकूण ७ नव्या शाखा सुरू करण्याचा मानस आहे, अशी माहिती रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. गडहिंग्लजमधील गणेश सांस्कृतिक भवनात झालेल्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.




गडहिंग्लज : वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक व शाखा चेअरमन.

ते म्हणाले, "पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांच्या सन्मानासाठी २१ महिने मुदतीच्या ठेवींना ८.५० टक्के व्याजदर देण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे." यावेळी एमपीएससीद्वारे तालुका कृषी अधिकारीपदी निवड झालेल्या मिलिंद चंद्रमणी यांच्यासह वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेले २३ सभासद, ८ सेवानिवृत्त सभासद आणि दहावी ते पदव्युत्तर पदवीप्राप्त १६ यशवंत पाल्यांचा सत्कार झाला. सीईओ डी. के. मायदेव, बोर्ड सचिव सागर माने, श्री. चौगुले, संचालक महेश मजती, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजयकुमार घुगरे, प्रा. विजयकुमार आरबोळे यांनी पत्रकांचे वाचन केले. रेखा पोतदार, डॉ. संजय चौगुले, प्रा. डॉ. किरण पोतदार, उमा तोरगल्ली यांनी विविध ठराव मांडले. सभेला सुहास नाडगौडा, प्राचार्य आनंद मेणसे, प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर, विजयकुमार हरगुडे, पूष्पा नेसरीकर, प्राचार्य राजाराम पाटील, अशोक येजरे, संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, सुशांत करोशे, मीना रिंगणे, प्रा. मनोहर पुजारी आदी उपस्थित होते. कल्पना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

### कुडाळ, गडहिंग्लज सुविधा केंद्रांचा गौरव

- ठेव संकलन, कर्ज व थकबाकी वसुलीसह सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेत शहरी विभागात प्रथम क्रमांक आल्याबद्दल गडहिंग्लज सुविधा केंद्राचे शाखाधिकारी अशोक सुळकुडे व सहकारी तर ग्रामीण विभागात प्रथम क्रमांक आल्याबद्दल कुडाळ शाखा चेअरमन अशोक येजरे, शाखा सल्लागार अजय चव्हाण, शाखाधिकारी विक्रम जांभेकर यांचा सत्कार झाला.